# गुरूंचे महत्त्व

## विषयसूची


卐 संकलकांचा परिचय ६

卐 आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ८

卐 मनोगत ११


## ग्रंथाची अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]


१. गुरु ११

१ अ. व्युत्पत्ती ११

१ आ. व्याख्या आणि अर्थ ११

१ इ. इतिहास १२

१ ई. गुरूंचे स्वरूप १३

१ उ. गुरुतत्त्व १३

२. गुरूंचे महत्त्व १३

२ अ. गुरुमहिमा १४

२ आ. शिक्षणशास्त्रदृष्ट्या ३०

२ इ. मानसशास्त्रदृष्ट्या ३१

२ ई. अध्यात्मशास्त्रदृष्ट्या ३४

* गुरूंकडे जाणे ३१

* गुरूंमुळे संकटांचे निवारण होणे ३१

* प्रारब्ध आणि गुरु ३२

* शिष्याला माध्यम न करता स्वयंप्रकाशी करणे ३३

* गुरूंच्या अस्तित्वाने शिष्याची उन्नती होणे ३५

* सिद्धींपासून दूर रहायला शिकवणे ३७
* गुरुकृपेने मिळालेल्या ज्ञानात ते ज्ञान समजण्याची शक्तीही त्याच वेळी गुरूंनी दिलेली असणे ३७
* गुरूंच्या प्रकारानुसार महत्त्व ३८

* गुरुप्राप्ती होण्याआधी आणि नंतरची शिष्याची उन्नती ३९
* गुरूंच्या प्रवचनाच्या वेळी ऋषीमुनी आणि देवता यांची उपस्थिती ४१
* देहत्यागानंतरही स्थुलातील अनुभूती देऊन शिकवणे ४१
* गुरूंचे आध्यात्मिक स्तरावरील महत्त्व सिद्ध करणारे वैज्ञानिक प्रयोग, तसेच साधकांनी केलेले सूक्ष्म परीक्षण ४२

卐 **गुरूंविषयी टीका वा अयोग्य विचार आणि त्यांचे खंडण ! ५९**

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ६१**


---

टीपा १. अध्यात्मविषयक सर्व ग्रंथांचे सामायिक मनोगत 'धर्माचे मूलभूत विवेचन' या ग्रंथात दिले आहे.

२. ग्रंथात साधकांनी लिहिलेल्या मजकुरात वा साधकांच्या अनुभूतींमध्ये 'प.पू. डॉक्टर', असा उल्लेख आला आहे, तो ग्रंथाचे संकलक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्याविषयी आहे.

## सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावाच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाच्या माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. सप्तर्षींच्या आज्ञेनुसार १३.५.२०२० या दिवसापासून सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ' असे संबोधले जात आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ''श्रीचित्‌शक्ति' ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.''

## मनोगत

सद्गुरुवांचूनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधी त्याचे ।
म्हणे ऐसें आंधळे हें जन । गेलें विसरून खऱ्या देवा ॥

– जगद्गुरु तुकाराम महाराज

सध्या बहुतेकांचे दैनंदिन जीवन धावपळ आणि कटकटी यांनी ग्रासलेले आहे. जीवनात मनःशांती आणि आनंद मिळवण्यासाठी साधना कोणती आणि नेमकी कशी करावी, याचे यथार्थ ज्ञान देतात, ते गुरु ! तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे आज समाज मात्र गुरूंचे महत्त्व विसरत चालला आहे. या ग्रंथात वर्णिलेली गुरुमहती वाचून जिज्ञासू अन् साधक यांची गुरूंविषयी श्रद्धा निर्माण होईल.

शिष्याच्या जीवनात गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे; कारण गुरूंविना त्याला ईश्वरप्राप्ती होऊच शकत नाही. गुरूंचे भक्तवत्सल रूप, दयाळू दृष्टी, शिष्यावर कृपा करण्याची माध्यमे इत्यादी नानाविध पैलूंद्वारे शिष्याला गुरूंच्या अंतरंगाचे खरे दर्शन या ग्रंथातून घडेल. यामुळे शिष्याची गुरूंविषयीची भक्ती दृढ होईल आणि त्याला गुरूंच्या अस्तित्वाचा अधिकाधिक लाभ करून घेता येईल.

शिष्याला गुरूंचे महत्त्व पटलेले असते; कारण त्याला गुरूंमधील आध्यात्मिक सामर्थ्याची प्रचीती आलेली असते. सध्याच्या विज्ञानयुगातील सर्वसामान्य व्यक्तीला मात्र प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक कसोटीवर सिद्ध केली असेल, तरच ती खरी वाटते ! त्यामुळेच तिचा अध्यात्मावर विश्वास बसून ती साधनेला लागते. यासाठी आम्ही आमचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांच्या छायाचित्राच्या संदर्भात ‘पिप’ या वैज्ञानिक प्रणालीचा उपयोग करून विविध प्रयोग केले. विज्ञानाच्या आधारेही गुरूंचे श्रेष्ठत्व कसे सिद्ध होते, याविषयीचे नाविन्यपूर्ण विवेचन, हे या ग्रंथाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे.

या ग्रंथातील मार्गदर्शनामुळे जिज्ञासूंचे साधकांत, साधकांचे शिष्यांत आणि शिष्यांचे गुरूंमध्ये रूपांतर व्हावे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !

– संकलक